स्थायी समिती

दाखल विषय – दि. ५/४/२०२१

विषय क्रमांक :– १७ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या डॉ.दळवी रूग्णालय येथे १८४ ऑक्सिजन बेड व १६ आय.सी.यु.बेडस व यापैकी १५ व्हेटिलेटर बेडस उभारण्यात येणा-या डेडीकेटेड कोव्हिड हॉस्पिटल ( डि.सी.एच.) डॉ.भिसे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) अन्वये व संदर्भ क्रमांक २ Letter of Acceptance ( LOA) नुसार कोव्हिड-१९ आजाराचा प्रादुर्भाव असेपर्यंत चालविण्यास देणेस,त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/०१ दि.५/४/२०२१ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE17F259
कोव्हिड १९ अंतर्गत जम्बो हॉस्पिटलसाठी खर्च.
मान्य तरतूद रक्कम रूपये ७५,००,००,०००/-

विषय क्रमांक :– १८ त्वर्य

मा.महेश वाबळे व मा.बाळासाहेब ओसवाल यांचे दि.५/४/२०२१ चे पत्र.

मे. सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांना पुणे मनपाच्या मिळकतीमध्ये सुरक्षा व्यवस्था पुरविणेचे काम निविदा क्र. ०१/२०१९ अन्वये १३५० बहुउद्देशीय कामगार पुरविणेचे काम देण्यात आलेले आहे.

कात्रज ते स्वारगेट बी.आर.टी. मार्गावरदेखील बहुउद्देशीय कामगार पुरविणे आवश्यक असल्याने मुख्य सुरक्षा अधिकारी यांनी दि.१८/२/२०२१ अन्वये माहे जानेवारी २०२१ ते फेब्रुवारी २०२१ पर्यंत वरील चालू निविदेच्या उपलब्ध आर्थिक मर्यादेत ३० बहुउद्देशीय कामगार पुरविणेबाबत कार्यआदेश दिलेले आहेत. सध्या देखील सदरचा मार्ग चालू असून त्यासाठी कार्यरत असलेले बहुउद्देशीय कामगार मुदत संपल्यावरदेखील काम करीत आहेत.

तरी सदर कात्रज स्वारगेट बी.आर.टी. मार्गावर कार्यरत असणाऱ्या ३० बहुउद्देशीय कामगारांना मुदतवाढ देण्यात यावी व सदर मार्गावर आणखी कमी पडणारे २२ बहुउद्देशीय कामगार वाढविण्यात येवून एकूण ५२ बहुउद्देशीय कामगार पुरविणेचे काम मे. सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. यांना देण्यास मान्यता देण्यात यावी.

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.